**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ , अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त द्वितीय अपिल**

**अपिल क्र.१४६४/२०११**
जा.क्र.
दिनांक -

अर्जदार तथा अपिलकर्ता
राजेश शंकरराव गवळी
नित्यानंद नगर, दुर्गा अपार्टमेंट समोर
पो.गांधीनगर अकोला

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रभारी प्रशासन अधिकारी, कार्यालय विभागिय कृषि सहसंचालक
अमरावती विभाग, अमरावती

२. जन माहिती अधिकारी तथा
प्रभारी लेखा अधिकारी, कार्यालय विभागिय कृषि सहसंचालक
अमरावती विभाग, अमरावती

**(आदेश पारीत दिनांक ०५/०१/२०१२)**

**- अंतरिम निर्णय -**

अर्जदार तथा अपिलकर्ता हजर आहे. श्री एन.एस.धनवटे, अधिक्षक तथा प्रभारी प्रशासन अधिकारी, कार्यालय विभागिय कृषि सहसंचालक, अमरावती हजर आहे.
श्री जि.पी.अमझटे, जन माहिती अधिकारी तथा प्रभारी लेखा अधिकारी, कार्यालय विभागिय कृषि सहसंचालक, अमरावती हजर आहे.

अर्जदाराने दि.१२/२/११ रोजी जोडपत्र-अ नुसार माहिती अधिकारी, विभागिय कृषि सहसंचालक अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे अर्ज करुन खालील प्रमाणे नमुद केले होते व त्यासंबंधी माहिती देण्यात यावी असे म्हटले होते.

*२००४ कृषि सेवक भरतीमध्ये मी पहिल्या यादीत पास झालो होतो.*
*तरी मला माझे लेखी परीक्षा व तोंडी परीक्षाचे गुण, गुणपत्रकासह देण्यात यावे.*

अर्जदाराने मागितलेली माहिती ही अगदी स्पष्ट आहे. आज सुनावणीला हजर असलेले उत्तरवादी यांचे म्हणण्यानुसार वरील माहिती कृषि आयुक्तालय, पुणे यांचेकडे असु शकते असे आज सुनावणी दरम्यान सांगितले. तरी जन माहिती अधिकारी यांनी वरील माहिती पुणे कार्यालयाकडुन मागवुन पुढील तारखेला अर्जदाराला देण्यासाठी या आयोगासमोर दाखल करावी. माहिती सादर न केल्यास संबंधितावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. माहिती उपलब्ध नसल्यास ती का उपलब्ध नाही यासंबंधी कारणमिमांसेसह संबंधिताचा लेखी खुलासा आयोगासमोर दाखल करावा. सदर आदेशाचे पालन न झाल्यास संबंधितावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची उत्तरवादी यांनी नोंद घ्यावी.

पुढील तारखेला उत्तरवादी यांनी या आयोगासमोर स्वतः हजर रहावे व वर निर्देश दिल्यानुसार संबंधित माहिती/लेखी खुलासा सादर करावा.

**पुढील तारीख - २३/०१/२०१२ (१०=०० वाजता)**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**प्रत कार्यवाहीकरीता - आयुक्त, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, पुणे - ५**

जिसकार/